# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(आस्थापना विभाग)

एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली - ४४२६०५

दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४, email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गों.वि/आस्था/3046 /२०१७

दिनांक 7.११.२०१७

## परिपत्रक

विद्यापीठातील पदव्यूत्तर शैक्षणिक विभाग व संलग्नीत सर्व महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, या परिपत्रकासोबत संलग्नीत मा. प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क. ईएलआर--२०१७/प्र.क्र.५६८/१७/का.३३ दि. २६.१०.२०१७ च्या पत्रानुसार दि. ३० नोव्हेंबर २०१७ पर्यंत छायाचित्र मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम आयोजीत आहे. या कार्यक्रमामध्ये वंचित मतदारांची, विशेषत: १८ ते २१ वयोगटातील नवतरूण मतदारांची, नोंदणी करणे तसेच मतदार यादीतील तपशीलामध्ये दुरूस्ती करण्याचे काम केले जाणार आहे. मतदार यादीच्या विश्लेषणावरून १८ ते २१ वर्षे वयोगटातील तरूणांचे मतदार नोंदणी प्रमाण फारच कमी असल्याचे दिसून येते. हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने सदर कार्यक्रमा अंतर्गत विद्यापीठाशी सर्व संलग्नीत महाविद्यालयातील १८ ते २१ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची मतदार यादीत नावे समाविष्ठ करण्यासाठी संलग्नीत पत्राप्रमाणे योग्य ती कार्यवाही घेवून सदर कार्यक्रमास सहकार्य करावे.

सहपत्र:

१. उपरोक्त पत्र

कुलसचिव (का.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतीलिपी:—

१. मा. प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली माहितीस्तव सादर.
३. मा. कुलसचिवांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली माहितीस्तव सादर.

निवडणूक/तातडीचे

अ.शा.पत्र क्र. ईएलआर-२०१७/प्र.क्र. ५६८ /१७/का.३३
सामान्य प्रशासन विभाग
मादाम कामा रोड, राजगुरु हुतात्मा चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : २६ ऑक्टोबर, २०१७

महाराष्ट्र शासन

अश्वनी कुमार
प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी

विषय : मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत वंचित मतदारांची नोंदणी करण्यासाठी विशेषत: प्रथमच मतदार म्हणून नोंदणीसाठी पात्र १८ ते २१ वयोगटातील तरुण भारतीय नागरिकांची नोंदणी करण्यासाठी सहकार्य करणे.

संदर्भ : १) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.२३/एलईटी/ईसीआय/एफयुएनसी/ईआरडी-ईआर, दि. १७ एप्रिल, २०१७
२) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.२३/एलईटी/ईसीआय/एफयुएनसी/ईआरडी-ईआर, दि. २३ ऑक्टोबर, २०१७
३) शासन निर्णय,कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग क्रमांक : मपवि-२०१७/प्र.क्र.३७/माफसू, दि.५ मे, २०१७
४) शासन निर्णय,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१६/प्र.क्र.६८३/१६/विशि-३, दिनांक १५ मे, २०१७
५) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१३५/१७/शिक्षण-१, दिनांक २ जून, २०१७
६) शासन परिपत्रक कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक : संकीर्ण-१५१७प्र.क्र.१८५/६-अे, दिनांक ५ जून, २०१७
७) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.२३/एलईटी/ईसीआय/२०१७/(Vol.II), दि. २३ ऑगस्ट, २०१७

प्रिय श्री केळमांवकर,

आपणांस माहितच आहे की, भारत निवडणूक आयोगाने दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ च्या पत्रान्वये दि. १.१.२०१८ या अर्हता दिनांकावर आधारित दि. ०३ ऑक्टोबर, २०१७ ते दि.०३ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीमध्ये छायाचित्र मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. आता या कार्यक्रमास भारत निवडणूक आयोगाने त्यांच्या दि. २३ ऑक्टोबर, २०१७ च्या पत्रान्वये दि. ३० नोव्हेंबर, २०१७ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. या कार्यक्रमामध्ये वंचित मतदारांची, विशेषत: १८ ते २१ वयोगटातील नवतरुण मतदारांची, नोंदणी करणे तसेच मतदार यादीतील तपशीलामध्ये दुरुस्ती करण्याचे काम केले जाणार आहे.

२. त्यास अनुसरुन मतदार यादीचे विश्लेषण केल्यास असे दिसून येते की, सद्यस्थितीत मतदार यादीमध्ये १८ ते २१ वर्षे वयोगटातील तरुणांचे मतदार म्हणून नोंदणीचे प्रमाण, त्यांच्या लोकसंख्येच्या तुलनेने, फार कमी आहे. त्यामुळे हे प्रमाण वाढविणे हा एक प्रमुख उद्देश या कार्यक्रमाचा आहे. या अनुषंगाने मी आपले लक्ष संदर्भाधिन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग/ कृषि, पशुसंवर्धन,

दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग/ उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/ परिपत्रकांकडे वेधू इच्छितो. या विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व विद्यापिठे, महाविद्यालये, तंत्रशिक्षण संस्था इत्यादी यांनी प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या सर्व मुलां/ मुलींकडून खालील आशयाचे प्रमाणपत्र/ हमीपत्र घेण्याबाबत प्रवेश अर्जामध्ये योग्य ती सुधारणा करावी असे निर्देश दिले आहेत.

"मी दिनांक ०१/०१/२०...........रोजी १८ वर्षाचा झालो/ झाले आहे किंवा होणार आहे. १८ वर्षे पूर्ण झाल्याबरोबर मी माझे नाव मतदार यादीत नोंदवून घेणार आहे अशी मी प्रतिज्ञा करतो /करते. यासाठी सोबत जोडलेला नमुना ६,७,८ व ८अ व्यवस्थीतपणे भरलेला आहे."

३. तसेच प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांच्याकडील एका जेष्ठ प्राध्यापकांना या कामासाठी "नोडल अधिकारी" म्हणून नेमावे असेही निर्देश दिले आहेत. याशिवाय जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याशी किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेले अधिकारी यांच्याशी समन्वय साधून सर्व मुलां/ मुलींचे अर्ज त्यांच्याकडे सुपूर्द करण्याची जबाबदारी देखील या नोडल अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.

४. आपणांस आठवतच असेल की, भारत निवडणूक आयोगाने यापूर्वी दि. १.७.२०१७ ते ३१.०७.२०१७ या कालावधीमध्ये देखील मतदारांची नोंदणी करण्यासाठी, विशेषत: १८ ते २१ वर्षे वयोगटातील तरुण मतदारांची नोंदणी करण्यासाठी, विशेष मोहिम हाती घेतली होती. त्यावेळी आपण महाराष्ट्रातील निवडणूक यंत्रणेला सर्वतोपरी सहकार्य दिल्यामुळे तरुण मतदारांची मोठया प्रमाणावर नोंदणी करणे शक्य झाले होते. त्याबद्दल मी भारत निवडणूक आयोगाच्यावतीने आभार व्यक्त करतो.

५. नमूद करण्यात येते की, वरीलप्रमाणे जुलै महिन्यामध्ये हाती घेण्यात आलेल्या विशेष मोहिमेच्यावेळी ज्या तरुण मतदारांची दि. ०१.०१.२०१७ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण झाली होती अशा मतदारांची नोंदणी करण्यात आली होती. मात्र आता हाती घेण्यात येत असलेल्या कार्यक्रमामध्ये दि. ०१.०१.२०१८ रोजी ज्या तरुणांची वयाची १८ वर्षे पूर्ण होणार आहेत अशा सर्व तरुणांची मतदार यादीमध्ये नोंदणी करावयाची आहे. त्यामुळे आपण यापूर्वी ज्याप्रमाणे निवडणूक यंत्रणेला सहकार्य दिले त्याप्रमाणे या कार्यक्रमाचे वेळी देखील सहकार्य दिल्यास सर्व तरुण मतदारांची नोंदणी करणे सहज शक्य होणार आहे.

६. तरी आपल्या नियंत्रणाखालील सर्व महाविद्यालये, तंत्रशिक्षण संस्था इत्यादि यांचे प्राचार्य यांनी त्यांना नेमून दिलेले कर्तव्य पार पाडावे तसेच निवडणूक यंत्रणेला आवश्यक ते सर्व सहकार्य द्यावे याकरिता आपण आपल्या स्तरावरुन सर्व प्राचार्यांना योग्य त्या सूचना दिल्यास मी आपला आभारी राहीन.

Best wishes,

आपला स्नेहांकित,

(अश्वनी कुमार)

प्रति,

श्री. नामदेव वेंकटराव कल्याणकर,
कुलगुरू,
गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली.